आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३१ डिसेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र उत्साहाचं वातावरण

- संजय गांधी निराधार योजनेसह इतर विशेष सहाय्य योजनांचं अनुदान थेट बँक खात्यात वर्ग करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

- आत्मसमर्पण केल्यानंतर फरार आरोपी वाल्मिक कराड बीड सीआयडीच्या ताब्यात

**आणि**

- डिसेंबर महिन्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या ४३ बांग्लादेशी नागरिकांना राज्यभरातून अटक

**<><><><><>**

२०२४ हे वर्ष संपायला आता अवघे काही तास शिल्लक आहेत. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी राज्यभरात जय्यत तयारी करण्यात आली आहे. नववर्ष स्वागताचा आढावा घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून ऐकूया…

**व्हॉईस कास्ट**

*नवीन वर्षाच्या स्वागतासाठी राज्यातले नागरिक सज्ज झाले आहेत. नाताळ आणि त्याला लागून आलेल्या सुट्ट्यांच्या निमित्ताने पर्यटक विविध पर्यटन स्थळांवर दाखल झालेत. नववर्षानिमित्त ठिकठिकाणी पार्ट्यांचं आयोजन करण्यात आलं आहे. हॉटेल, समुद्र किनारे, चौपाट्या, पब, डिस्कोथेक अशा विविध ठिकाणांवर*

*नवीन वर्षाचं स्वागत केलं जाणार आहे. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुंबईत  १५ हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. मद्यपान करून गाड्या चालवणाऱ्यांविरोधात पोलीस विशेष मोहीम राबवणार आहेत. मुंबई तसंच ठाणे भागातल्या निर्जन जागांवर पोलिसांच्या ड्रोनची गस्त असणार आहे. पोलिसांनी समुद्र किनाऱ्यांवरच्या गस्तीतही वाढ केली असून वाहतुकीच्या मार्गांमध्ये बदल केला आहे. नववर्षाचं स्वागत आटोपून घरी परतणाऱ्यांसाठी विशेष रेल्वे गाड्या आणि बेस्ट बसेस सोडण्यात येणार आहेत.*

*पालघर जिल्ह्यातल्या केळवा, चिंचणी, डहाणू, बोर्डी, घोलवड, सफाळा, वसई, अर्नाळा या समुद्र किनाऱ्यांसह इतर ठिकाणीही कडेकोट पोलीस बंदोबस्त आहे. भंडारदरा धरणाचा परिसर, घाटघर, रतनवाडी व्हॅलीतही पर्यटकांनी गर्दी केलीय. नवी मुंबई, नाशिक आणि पुण्यासह इतरत्रही पोलीस आणि वाहतूक शाखेचे कर्मचारी मोठ्या प्रमाणात कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पार पाडताना दिसत आहेत. पुण्यात पार्ट्यांवरही पोलीसांचं विशेष लक्ष आहे. नाशिक शहरातही ६५ ठिकाणांवर ड्रिंक अँड ड्राईव्ह विरोधात नाकाबंदी करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी, फिरस्ती पथकही तैनात करण्यात आली आहेत.*

**<><><><><>**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झालेत. त्यामुळे समुद्रकिनारे  आणि पर्यटन स्थळ पर्यटकांनी गजबजून गेली आहेत.  याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून…

**होल्ड  व्हाइस कास्ट**

*गतवर्षीच्या तुलनेत यंदाचा पर्यटन हंगाम तेजीत आहे. त्यामुळे लाखोंची उलाढाल होत आहे. जिल्ह्यातल्या शिरोडा, वेंगुर्ले, देवगड, मालवण या महत्त्वाच्या समुद्रकिनारी पर्यटकांची गर्दी आहे. नाताळ सुट्टी आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी देशभरातून येणाऱ्या पर्यटकांच्या स्वागतासाठी पर्यटन व्यावसायिकांनी जय्यत तयारी केली होती. किनारपट्टी भागाबरोबरच कृषी पर्यटनाकडे देखील पर्यटकांचा यंदा कल दिसून येतोय, त्यामुळे सगळी रिसॉर्ट्स, हॉटेल्स हाऊसफुल आहेत. अपघाताच्या घटना घडू नयेत यासाठी मद्यपी वाहन चालकांवर कारवाईसाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. समुद्रकिनाऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी होमगार्ड सागरी सुरक्षा दलाला पोलीस यंत्रणेन मदतीला घेतल आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी*

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ हे वर्ष संपायला अवघे काही तास शिल्लक आहेत. या वर्षभरात सामाजिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आज आपण ‘सरत्या वर्षाच्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कोरेगाव भीमा इथं उद्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यानिमित्त होणारी गर्दी लक्षात घेऊन, पुणे ग्रामीण पोलिसांद्वारा चोख बंदोबस्त राखला जाणार आहे. वाहतुक आणि गर्दीच्या नियोजनासाठी ८०० पोलीस कर्मचारी तैनात करणार

असल्याचं पुणे ग्रामीण पोलीसांनी कळवलं आहे. कोरेगाव भिमा परिसरात ४५ ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३०० सीसीटीव्ही, १० ड्रोन, आणि ५० पोलीस टॉवरद्वारे परिसरात देखरेख ठेवली जाईल. चोरीच्या घटना रोखण्यासाठी विशेष पोलीस पथकही तैनात असेल.

अभिवादन कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनुयायांच्या सोयीसाठी जिल्हा परिषदेच्या वतीनं विजयस्तंभ सुविधा हे मोबाईल ॲपही उपलब्ध करून दिलं गेलं आहे.

**<><><><><>**

शासनाच्या विशेष सहाय्य योजनांचं अनुदान DBT अर्थात थेट लाभ हस्तांतरण पोर्टलद्वारे पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यांत वर्ग करण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबईत सामाजिक न्याय, आदिवासी विभागाच्या पुढील शंभर दिवसांच्या आराखड्याचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन आदी योजनांच्या अर्थसाहाय्याचं वितरण या पोर्टल च्या माध्यमातून केलं जाणार आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींना सर्व सोई सुविधा वेळेवर मिळतील याची खात्री करावी, वसतीगृहाची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन करावी, जात पडताळणी प्रक्रिया ऑनलाईन करावी, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी पोर्टल लवकरात लवकर सुरू करावं, अशा सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी या बैठकी दरम्यान दिल्या.

तसंच साखर गळीत हंगामात ऊस क्षेत्र, ऊस उत्पादन आणि ऊस उत्पादकता याचा अचूक अंदाज येण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, रिमोट सेन्सिंग अर्थात

दूरस्थ संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणाली सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या. सहकार विभागाच्या पुढील १०० दिवसाच्या नियोजनाचा आढावा घेताना मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले.

**<><><><><>**

राज्यातील सोयाबीन खरेदीसाठी नोंदणीला ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज केली. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ (NCF) मार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार असल्याची माहिती रावल यांनी दिली.

**<><><><><>**

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात तसंच पवन ऊर्जा कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी फरार असलेल्या वाल्मिक कराडने आज पुण्यात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे आत्मसमर्पण केलं. बीड गुन्हे अन्वेषण विभाग या प्रकरणी अधिक तपास करणार असून आरोपीला त्यांच्या ताब्यात दिलं आहे, असं राज्य गुन्हे अन्वेषन विभागाचे पोलीस उपमहानिरीक्षक सारंग आव्हाड यांनी बातमीदारांना सांगितलं . शरण येण्यापूर्वी कराड यानं स्वतःचा एक व्हिडिओ प्रसिद्ध केला असून यात स्वत:वरचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपल्यावर राजकीय द्वेषापोटी आरोप करण्यात आले असून चौकशीअंती आपण दोषी आढळलो तर शिक्षा भोगायला तयार असल्याचं त्यानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला जे जबाबदार असतील, ज्यांच्याविरुद्ध पुरावे असतील त्या सर्वांवर कडक कारवाई करू, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राज्यात गुंडांचं, हिंसेचं, खंडणीखोरांचं राज्य चालू देणार नाही. या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे. त्यामुळेच वाल्मिक कराड यांना शरणागती पत्करावी लागली, असं सांगून उर्वरित फरार आरोपींना पकडण्यासाठी पथकं काम करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

दहशतवाद विरोधी पथकानं डिसेंबर महिन्यात राज्यभरातून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या ४३ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली आहे. त्यातल्या १९ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. गेल्या चार दिवसांत विक्रोळी, नाशिक, अकोला, नांदेड आणि औरंगाबादमधून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या ९ बांग्लादेशी नागरिकांना अटक केली आहे. अटक केलेल्यांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र तयार करून घेतली आहेत.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं मुंबईतल्या सांगली सहकारी बँकेवर लादलेले निर्बंध २७ डिसेंबरपासून मागे घेतले आहेत. जुलै २०२२ मध्ये रिझर्व्ह बँकेनं हे निर्बंध लादले होते. बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानं हे निर्बंध हटवल्याचं रिझर्व्ह बँकेनं आज प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली इथे आज सदिच्छा भेट घेतली. कोराडी इथल्या जगदंबेची काष्ठशिल्पातली मूर्ती यावेळी बावनकुळे यांनी मोदी यांना भेट दिली आणि आई जगदंबेच्या दर्शनाला येण्याची विनंतीही केली.

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रातली हवेची खालावलेली गुणवत्ता लक्षात घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेनं तातडीच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यानुसार, रस्त्यांवर चर खोदण्याच्या कामाला तात्काळ प्रभावानं मनाई करण्यात आली आहे.ही मनाई पुढील आदेश येईपर्यंत लागू असेल.

पाणी पुरवठ्याच्या मुख्य जलवाहिनी गळतीच्या कामकाजाचा अपवाद वगळता, नवीन चर खोदण्याच्या परवानग्या दिल्या जाणार नाहीत, असं महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

केवळ ईमेल द्वारे वीज बिल स्वीकारणाऱ्या ग्राहकांना महावितरणनं नववर्षाची भेट म्हणून वीजदेयकावर एकाच वेळी १२० रुपयांची सवलत देऊ केली आहे. कागद वाचवा, पर्यावरण सांभाळा या संकल्पनेशी सुसंगत असणाऱ्या या योजनेनुसार दर महिन्याच्या देयकावर १० रुपयांची सवलत दिली जात होती.

**//<><><><><>//**